# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/01/2023 (गुरूवार) सकाळ

## चोरी

**१) पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत १५ कि.मी अंतरावर मौजा चावला पेट्रोलपंप छत्रपुर शिवार येथे दिनांक ११/०१/२०२३ चे ०३.०० वा. ते ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– धरमपाल सोनबा खातरकर, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. १३, प्राथमिक शाळे जवळ बल्लाचाळ, आमला ता. आमला जि. बैतुल (एम.पी) याचे ट्रक क्र. एम. पी. –०९/एच.एच.–३१४६ मधील अंदाजे २०० लिटर डिझेल किंमती अंदाजे १८,८००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ७७१ पवार मो. नं. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १२ कि.मी अंतरावर मौजा वरोडा ते चौदामैल येथे दिनांक ०८/०१/२०२३ चे ००.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– संजय लोटु पाटील, वय ४९ वर्ष, रा. वाढोणा, पोस्ट फेटरी ता. नागपूर याने रोड क्र. एन. एच. ५४७ ई हायवे सावनेर ते चौदामैल रोड असुन त्या रोडवर ट्राफिकबाबत माहितीसाठी कंपनीने कॅमेरे लावलेले आहे. दि. ११/०१/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. फिर्यादी हा आपले ड्युटीवर हजर होता. तेव्हा कंपनीचे मॅनेजरने सांगितले की, हायवे रोडवर लावलेले कॅमेरेचे बॅटरी तसेच इतर वस्तु चोरी झाल्याने कॅमेरे कॅच करत नाही म्हणुन फिर्यादीने वरोडा ते चौदामैल पर्यंत असलेले कॅमेरे व ईतर वस्तुची पाहणी केली असता इन्वेटर बॅटरी असा एकुण किंमती अंदाजे १०,०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक प्रकाश हिवरकर मो. नं. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**